www.esakal.com

# सकाळ

मुंबई । २८ ऑगस्ट २००८ । पाने १६ (टुडेसह) + स्मार्ट सोबती

## यशस्वी शस्त्रक्रिया

# २६० किलोच्या विराणींचे वजन घटणार!

## तब्येत ठणठणीत : भूक कमी करण्यासाठी जठराचा आकार केला कमी

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. २७ : 'सुमो' पैहलवानांनाही लाजवेल अशा २६० किलो वजनाच्या सुलेमान विराणींचे वजन घटविण्यासाठी वोक्हार्ट रुग्णालयात नुकतीच शस्त्रक्रिया करण्यात आली. वर्षभरात वजन पाच पंचवीस नव्हे तर चक्क शंभर किलोंनी घटेल, असा दावा डॉक्टरांकडून करण्यात येत आहे. शस्त्रक्रियेनंतर त्यांची तब्येत ठणठणीत असून आठवडाभरात वजन १४ किलोंनी कमी झाल्याचे सुलेमान यांनी सांगितले.



### 'वोक्हार्ट'चा पुढाकार

मुंबईत वोक्हार्ट, सैफी आणि ब्रीच कँडी या मोठ्या रुग्णालयांमधून अशा प्रकारच्या शस्त्रक्रियेची सोय उपलब्ध आहे. 'वोक्हार्ट'च्या प्रशासनानेही याबाबत पुढाकार घेतला असून माहितीसाठी ०२२६७९९४१२१ किंवा २३ या क्रमांकावर संपर्क साधावा.

सुरुवातीपासूनच लठ्ठ असलेल्या सुलेमान विराणींचे वजन गेल्या पाच वर्षांपासून आणखी वाढू लागले. लठ्ठपणामुळे हालचाल करणेही त्यांना मुश्किल होऊ लागले. गेली पाच वर्षे ते घराच्या बाहेरही पडले नव्हते. शेवटी त्यांनी शस्त्रक्रियेचा पर्याय निवडला. त्यांच्या कुटुंबातच लठ्ठपणाचा इतिहास असल्याने त्यांचे हे दुखणे अनुवंशिक असल्याचे त्यांच्यावर शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉ. रमन गोयल यांनी सांगितले. सुलेमान यांच्या जठराचा आकार मोठा असल्याने त्यांना एकसारखी भूक लागत असे व ते भरपूर खात असत. खाण्यावर नियंत्रण ठेवणे त्यांना अशक्य बनल्याने त्यांचे वजन दिवसागणिक वाढतच गेले. 'बॅरिॲट्रिक शस्त्रक्रिया' करून त्यांच्या जठराचा आकार कमी करण्यात आला. त्यामुळे आता कमी खाऊन त्यांची भूक भागत असल्याने वजन घटेल, असेही डॉ. गोयल म्हणाले.

लठ्ठपणाच्या शस्त्रक्रियेमध्ये शरीरातील अतिरिक्त चरबी काढून टाकली जाते, असे अनेक गैरसमज आहेत. मात्र असे काहीही केले जात नाही. ही शस्त्रक्रिया चार-पाच प्रकारे करता येते, त्यासाठी सुमारे तीन ते साडेतीन तास एवढा वेळ लागतो.